**महाराष्ट्र जनशक्ती**

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ५५ वा | दिनांक : २०/११/२०२४ | वार : बुधवार

## पैशांसंदर्भात पोलिसात नोंद नाही, भाजप नेत्याने टीप दिल्याचा दावाही खोटा विनोद तावडेंचे स्पष्टीकरण



**मुंबई :** माझी प्रतिमा मलिन व्हायचे कारण नाही, कारण पैशाचा विषय माझा नाही. पैशांसंदर्भातल्या सगळ्या बातम्या खोट्या आहेत. भाजपच्या लोकांनी टीप दिली, हे हितेंद्र ठाकुर धादांत खोटे सांगत आहेत. टीप दिल्याचा दावा हा खोटा आहे, असे स्पष्टीकरण भाजप नेते विनोद तावडे यांनी दिले. ते आज सायंकाळी माध्यमांशी बोलत होते. कुणाला शंका असल्यास तुम्ही चौकशी करावी, सीसीटीव्ही तपासावे, असेही विनोद तावडे म्हणाले.

विनोद तावडे म्हणाले, वसई येथील घटनेसंदर्भात तीन एफआयआर नोंदवण्यात आले आहेत. मी आणि हितेंद्र ठाकुर दोघांनी मिळून पत्रकार परिषद घेतल्यामुळे एक, माझा मतदारसंघ नसताना मी तिथे गेलो हा दुसरा आणि हितेंद्र ठाकुरही त्यांचा मतदारसंघ नसताना तिथे आले, याबाबत तिसरा एफआयआर नोंद झाला आहे. मात्र, पैशाचा एकही एफआयआर नोंदवण्यात आला नाही. पैशांसंदर्भातल्या सर्व बातम्या खोट्या आहेत.

पुढे बोलताना विनोद तावडे यांनी हितेंद्र ठाकुर यांच्या टीपच्या विधानावरही भाष्य केले. भाजपच्या नेत्याने टीप दिल्याचे हितेंद्र ठाकुर यांनी म्हटले होते, मात्र हे धादांत खोटे आहे. त्यात काही तथ्य नाही, असे तावडे यांनी सांगितले. तुम्हाला शंका आली असेल, तर तुम्ही पैसे तपासा, हॉटेलमधील सीसीटीव्ही तपासा. जे मिळेल ते करा, माझे काही म्हणणे नाही, असे तावडे म्हणाले.

दरम्यान, विनोद तावडे यांचे वसई येथील घटनेबाबत निवेदन जाहीर केले आहे. त्या ते म्हणाले की, वाडा येथून आज मी मुंबईला परतत असताना वसई परिसरात आल्यावर स्थानिक भाजप उमेदवार राजन नाईक यांना चौकशीसाठी फोन केला. आम्ही सर्व कार्यकर्ते वसई येथे एका हॉटेलमध्ये आहोत, आपण चहाला या, असे त्यांनी सांगितले. मी तेथे पोहोचल्यावर स्वाभाविकपणे निवडणुकीची चर्चा झाली. मतदानाच्या दिवशीची तांत्रिक प्रक्रिया व आपण घ्यायची काळजी याविषयी मी बोलत होतो. त्यावेळी अचानक काही कार्यकर्ते आले व त्यांनी माझ्याभोवती कोंडाळे करून आरडाओरडा सुरू केला. हे कार्यकर्ते बहुजन विकास आघाडीचे असल्याचे समजल्यानंतर मी त्या पक्षाचे प्रमुख हितेंद्र ठाकूर यांना फोन केला व आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना आवरावे, अशी विनंती केली.

हितेंद्र ठाकूर व आमदार क्षितीज ठाकूर तेथे आले. त्या दोघांशी बोलणे झाल्यावर त्यांच्यासोबत मी एकाच गाडीतून बाहेर पडलो. हा सर्व घटनाक्रम सीसीटीव्हीमध्ये टिपला गेला आहे. मी केवळ भाजपा कार्यकर्त्यांसोबत चहापानासाठी गेलो होतो व चर्चा करत होतो. त्यावेळी माझ्याकडून पैसे वाटप होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. या संदर्भातील सीसीटीव्ही चित्रण तपासावे म्हणजे दूध का दूध, पानी का पानी, स्पष्ट होईल. राहुल गांधी व सुप्रिया सुळे अशा यासंदर्भात टीका करणाऱ्या नेत्यांनी वस्तुस्थिती समजून घ्यावी. तसेच याबाबतीत मा. निवडणूक आयोगाकडून निःपक्ष चौकशी व्हावी, असे विनोद तावडे यांनी निवेदनात म्हटले आहे.

## भाजप उमेदवार प्रताप अडसड यांच्या बहीणीवर हल्ला

**अमरावती** :अमरावती येथील धामणगाव विधानसभा मतदारसंघात भाजप उमेदवार प्रताप अडसड यांच्या बहीण अर्चना रोठे (अडसड) यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. चांदूर रेल्वे पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेले सातेफळ फाट्यावर रात्री उशिरा हा हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात अर्चना रोठे गंभीर जखमी झाल्या आहेत.

सोमवारी रात्री अर्चना रोठे प्रचार संपवून परतत असताना सातेफळ फाट्यावर अज्ञात हल्लेखोरांनी अर्चना रोठे यांची गाडी अडवत चारही बाजूने हल्ला केला. त्यांची एमएच २७ डीबी ५००१ क्रमांकाची कार होती, या कारचा समोरचा काच देखील हल्लेखोरांनी तोडण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच अर्चना रोठे यांच्या मानेवर वार करण्याचा प्रयत्न देखील या हल्लेखोरांनी केला, मात्र अर्चना यांनी हा वार आपल्या हातवार झेलल्यामुळे त्यांच्या हाताची नस कापली गेली. जखमी झालेल्या अर्चना रोठे यांना तातडीने डॉ. ढोले यांच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचार घेतल्यानंतर त्यांना अमरावतीच्या रुग्णालयात हलविण्यात आले.

अर्चना रोठे यांच्यावर झालेल्या या हल्ल्याप्रकरणी चांदूर रेल्वे पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. पोलिसांनी अज्ञात हल्लेखोरांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, अर्चना रोठे यांच्यावर हल्ला केल्यानंतर हल्लेखोर अंधारात पसार झाले. पोलिस आता या हल्लेखोरांचा शोध घेत असून येथील वातावरण देखील तापले आहे.

या हल्ल्यानंतर प्रताप अडसड म्हणाले, या घटनेमुळे कार्यकर्त्यांनी घाबरू नये किंवा कुठल्याही प्रकारचा गोंधळ घालू नये. प्रत्येकाने आपले गाव सोडून इतर कुठेही जाऊ नये. हा संपूर्ण प्रकार आपण गोंधळ घालावा यासाठी विरोधकांनी रचलेला कट असू शकतो, अशी शंका प्रताप अडसड यांनी व्यक्त केली आहे. सर्वांनी आपापल्या घरात राहावे व मतदानाच्या दिवशी मतदारांना बाहेर काढावे, असे आवाहन देखील प्रताप अडसड यांनी केले आहे.

## आरपी कॉलेजचा ओंकार सोनटक्के सेंट्रल झोन ज्युदो स्पर्धेत प्रथम



**धाराशिव :** येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाच्या ओंकार सोनटक्के याने पश्चिम विभाग ज्युदो स्पर्धेत विजेतेपद पटकावले आहे. ओंकार हा बीएससी भाग-१ चा विद्यार्थी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर येथे ही स्पर्धा घेण्यात आली. या कामगिरीमुळे ओंकार सोनटक्के याची त्याची ऑल इंडिया स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यशाबद्दल ओंकार याचा रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख यांनी अभिनंदन केले.

## नाशिक रोडला चिठ्ठी लिहून ठेवत तरुणीची गच्चीवरून उडी घेत आत्महत्या

**नाशिक** : येथील दत्त मंदिर रोडवरील ड्रीम हाउस या इमारतीतील २२ वर्षीय तरुणीने (दि. १८) सकाळच्या सुमारास इमारतीच्या गच्चीवरून उडी मारत आत्महत्या केली. तरुणीने आत्महत्ये पूर्वी लिहून ठेवलेल्या चिठ्ठीत तिला नैराश्याने ग्रासल्याचे समोर आले, मात्र ठोस कारण दिले नाही.

उपनगर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दत्त मंदिर रोडवरील ड्रीम हाउस या इमारतीच्या चौथ्या मजल्यावरील फ्लॅटमध्ये आपल्या दोन्ही आजींसोबत राहणारी कस्तुरी विवेक मायाळू (२२) हिने सकाळी १०.३० च्या सुमारास आपल्या पाळीव श्वानाला फिरवून आणते, असे आजीला सांगितले. मात्र गच्चीवर जाऊनथेट खाली उडी घेतल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. तिला उपचारा-साठी ठाकरे रुग्णालयात दाखल केले असते, डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. कस्तुरीचे वडील विवेक हे रेल्वेत दिल्ली येथे नोकरीस असून तिची आई वंदना याचार दिवसांपूर्वी दिल्लीला गेल्या आहेत. तर कस्तुरीची मोठी बहीण परदेशात नोकरीला आहे.

कस्तुरीच्या दोन्ही आजी आणि कस्तुरी अशा तिघी घरी होत्या. तिच्या घरी कर्ते असे कोणीही नसल्याने माजी नगरसेविका संगीता गायकवाड, अतुल धोंगडे, सूर्यकांत लवटे, रमेश धोंगडे यांनी घटनास्थळी धावघेत सहकार्य केले.

कुत्र्याला फिरवून आणते, असे सांगत कस्तुरी गच्चीवर गेली. कस्तुरीच्या आत्महत्येची घटना समजल्यानंतर तिच्या दोन्ही आजींनी हंबरडाच फोडला. 'दिव्य मराठी' च्या प्रतिनिधीने अधिक चौकशी केली असता, या आजींनी सांगितले की, चार दिवसांपासून कस्तुरी जास्त बोलत नव्हती, सकाळीही कुत्र्याला फिरवून आणते, नंतर स्नान करते असे तिने सांगितले. आम्ही स्वयंपाक करीत असतानाच ही घटनाघडली.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २० नोव्हेंबर २०२४


## ‘हा ‘नोट जिहाद’ आहे का? पैसा बाटेंगे आणि ...’



**विरार :** विरारमध्ये भाजप नेते विनोद तावडेंना बहुजन विकास आघाडीचे नेते हितेंद्र ठाकूर आणि त्यांचे पुत्र क्षितीज ठाकूर यांनी विनोद तावडेंच्या बॅगेत ५ कोटी रुपये असल्याचा गंभीर आरोप केला. या प्रकरणावर आता उद्धव ठाकरे यांनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे. “काल माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचं डोकं आपोआप फुटलं. त्यानंतर आज पैसे वाटपाचा व्हिडिओ समोर आला हे जादूचे पैसे आले कुठून? कुणाच्या खिशातून जात होते? याची माहिती समोर आली पाहिजे. आणि ज्यांनी हे उघड केलं असेल त्यांचं कौतुक केलं पाहिजे. पण कदाचित हे त्यांचं आपापसातील गँगवार असू शकेल. भाजपांतर्गत किंवा मिंदे आणि त्यांच्यातर्गतही असू शकेल ”, अशी शक्यता उद्धव ठाकरेंनी व्यक्त केली.

भाजप-शिंदे आणि अजित पवारांचा हा नोट जिहाद आहे का? पैसा बाटेंगे आणि जितेंगे असं काही आहे का? त्याचा छडा लागायला पाहिजे. हा भाजपचा नोट जिहाद आहे, पैसा बाटेंग और जितेंगे असं काहीसं आहे. यावर आता कठोर कारवाई व्हायला हवी, अशी प्रतिक्रिया उद्धव ठाकरेंनी व्यक्त केली.






# मणिपूर पुन्हा हिंसाचाराच्या विळख्यात,

**मणिपूर :** मणिपूर पुन्हा एकदा हिंसाचाराच्या विळख्यात सापडलं आहे. शनिवारी (१६ नोव्हेंबर) झालेल्या या हिंसाचारात इंफाळ खोऱ्यातील अनेक आमदार आणि मंत्र्यांच्या घरांवर हल्ले करण्यात आले सोबतच अनेक वाहनांचीही जाळपोळ करण्यात आली.

यासंदर्भात मणिपूर पोलिसांनी सोशल मिडीयाच्या माध्यमातून सांगितलं की, “इंफाळमध्ये संतप्त जमावाने राज्यातील मंत्री आणि आमदारांसह अनेक लोकप्रतिनिधींच्या घरांना आणि मालमत्तेला लक्ष्य केलं आहे. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या.”

पोलिसांच्या या कारवाईत आठ जण जखमी झाले आहेत. परिस्थिती आणखी चिघळू नये म्हणून स्थानिक प्रशासनानं इंफाळसह अनेक भागात संचारबंदी लागू केली आहे. याशिवाय अनेक ठिकाणी इंटरनेट सेवाही बंद करण्यात आली आहे.

१६ नोव्हेंबरला मणिपूर सरकारनं केंद्र सरकारला राज्यातील सहा पोलिस ठाण्यांमधून AFSPA (आर्म्ड फोर्सेस स्पेशल पॉवर्स ॲक्ट) हटवण्याची विनंती केली आहे.

AFSPA कायद्याअंतर्गत अशांत भागात सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी सशस्त्र दलांना विशेष अधिकार देण्यात आले आहेत.

या कायद्याचा वापर करून सशस्त्र दल कोणत्याही भागात पाच किंवा त्यापेक्षा जास्त लोकांच्या एकत्र येण्यावर बंदी घालू शकतात.

एखादी व्यक्ती कायद्याचं उल्लंघन करताना आढळल्यास त्या व्यक्तीवर बळाचा वापर करू शकतात तसेच त्या व्यक्तीवर गोळ्या झाडण्याचीही अनुमती हा कायदा त्यांना देतो.

AFSPA कायदा सशस्त्र दलांना वॉरंटशिवाय कोणत्याही व्यक्तीला अटक करण्याचा आणि कोणत्याही परिसरात प्रवेश करून झडती घेण्याचा अधिकार देतो.

मणिपूर विधानसभेतील नॅशनल पीपल्स पार्टीचे आमदार शेख नूरुल हसन यांनी बीबीसीला सांगितलं, “साधारणतः संध्याकाळी चार वाजताच्या सुमारास १००-१५० लोकांचा जमाव माझ्या घरी आला होता. परंतु मी दिल्लीला आलो होतो म्हणून जमावातील काही लोकांशी मी फोनवरच बोललो.”

“त्या लोकांचं असं म्हणणं होतं की, सध्याचे आमदार आणि मंत्री मणिपूरमधील परिस्थिती हाताळण्यास सक्षम नाहीत त्यामुळे लोक त्यांच्या राजीनाम्याची मागणी करत होते.

त्यांच्या सगळ्या मागण्या मान्य करत मी त्यांना सांगितलं की जनता जे सांगेल ते करायला मी तयार आहे. त्यामुळे माझ्या घरावर हल्ला न करता ते निघून गेले”, असं आमदार शेख नरुल हसन यांनी सांगितलं.

दुसरीकडे अपक्ष आमदार सपम निशिकांत सिंह यांच्या घरावर काही लोकांनी हल्ला केला आणि त्यांच्या घराच्या गेटसमोरील सुरक्षा चौकी उद्ध्वस्त केली.

याच जमावानं इंफाळमधील सगोलबंद भागातील आमदार आरके इमो यांच्या घरावरही हल्ला केला आणि तेथील फर्निचरसह अनेक वस्तू देखील जाळल्या.

इंफाळमध्ये लागू करण्यात आलेल्या कर्फ्यूचा प्रभाव रविवारी सकाळी दिसून आला. तेथील रस्ते पूर्णपणे सुनसान झाले आहेत. मणिपूरमधील इम्फाळ खोऱ्यात मैतेई समाज बहुसंख्य आहे.

राजधानी इंफाळमधील शहरी भागातील सुरक्षेच्या कारणास्तव लष्कर आणि आसाम रायफल्सच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत.

शनिवारी झालेल्या हिंसाचारानंतर पोलिसांनी २३ जणांना अटक केली तसेच काही शस्त्रंही जप्त केली आहेत.

मणिपूर पोलिसांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर सांगितलं की, पुढील आदेश येईपर्यंत इंफाळ शहरात कर्फ्यू लागू करण्यात आला आहे तसेच इंटरनेट सेवा देखील दोन दिवस बंद ठेवण्यात आली आहे.

मणिपूरमधील हिंसाचारानंतर कोणत्याही प्रकारचा जातीय हिंसाचार भडकण्यापासून रोखता यावा म्हणून शेजारी असलेल्या मिझोराम राज्यातील लोकांनाही विशेष खबरदारी घेण्यास सांगण्यात आलं आहे.

७ नोव्हेंबर रोजी मणिपूरमधील जिरीबाम मध्ये सशस्त्र अतिरेक्यांनी कुकी समुदायातील एका महिलेवर गोळ्या झाडल्या आणि तिला तिच्या घरासह जाळलं. या घटनेनंतर जिरीबाममध्ये हिंसाचाराची मालिका सुरूच आहे.

११ नोव्हेंबर रोजी जिरीबाम जिल्ह्यात सीआरपीएफ आणि अतिरेक्यांमध्ये कथित चकमक झाली. मणिपूर "सशस्त्र अतिरेक्यांनी जिरीबाम जिल्ह्यातील जाकुराडोर भागात असलेल्या सीआरपीएफच्या चौकीवर हल्ला केला. त्यानंतर सुरक्षा दलांनी लगेच प्रत्युत्तर दिलं."

४० मिनिटं चाललेल्या या चकमकीनंतर लगेचच पोलिसांनी १० सशस्त्र अतिरेक्यांचे मृतदेह ताब्यात घेतल्याची खात्री केली. चकमकीत ठार झालेले सर्व आदिवासी तरुण होते.

या घटनेनंतर जिरीबाम जिल्ह्यात शांतता राखण्यासाठी अनिश्चित काळासाठी कर्फ्यू लावण्यात आला आहे.

या चकमकीनंतर बोराबेकरा पोलिस ठाण्याजवळील छावणीतून मैतेई समुदायातील एकाच कुटुंबातील सहा सदस्य बेपत्ता झाले होते. यामध्ये तीन लहान मुलांचा देखील समावेश होता आणि सशस्त्र अतिरेक्यांनी या लोकांचं अपहरण केल्याचा आरोप मैतेई समुदायातील लोकांनी केला आहे.

या घटनेबाबत लोकांमध्ये प्रचंड संताप असून या विरोधात इंफाळमध्ये महिलांनी ठिकठिकाणी निदर्शनं केली. दरम्यान पाच दिवसांनंतर म्हणजेच १५ नोव्हेंबरला जिरीमुक गावाजवळील छावणीपासून सुमारे २० किलोमीटर अंतरावरील नदीत तीन मृतदेह आढळून आले. यामध्ये एक महिला आणि दोन लहान मुलांचा समावेश होता. यानंतर इंफाळमध्ये नव्याने हिंसाचाराचं चक्र सुरू झालं.

मात्र या मृतदेहांचे पोस्टमार्टम होईपर्यंत हे बेपत्ता लोकांचे मृतदेह आहेत की नाही याबाबत काहीही सांगता येणार नाही, असे पोलिसांनी म्हटलं आहे. परंतु हे मृतदेह बेपत्ता लोकांचेच असल्याचं स्थानिक मीडियाच्या वृत्तात म्हटलं गेलं आहे.

दरम्यान लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मणिपूरमधील या ताज्या हिंसाचाराच्या घटनेबाबत दिली आहे.

त्यांनी म्हटलं आहे, "मणिपूरमध्ये अलीकडच्या काळात झालेला हिंसक संघर्ष आणि सततचा रक्तपात यामुळे चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. एका वर्षाहून अधिक काळ चालु असलेल्या या विभाजन आणि त्रासानंतर केंद्र आणि राज्य सरकार या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेल अशी प्रत्येक भारतीयाची आशा होती."

"मी पंतप्रधानांना पुन्हा एकदा मणिपूरला भेट देऊन तिथे शांतता प्रस्थापित करण्यासाठी आणि सुधारणेसाठी काम करण्याची विनंती करत आहे," असेही पुढे ते म्हणाले.

दरम्यान, मणिपूरमधील या घटनेवर राष्ट्रीय जनता दलानेही प्रतिक्रिया दिली आहे. आरजेडीचे प्रवक्ते मृत्युंजय तिवारी म्हणाले की, "मणिपूर धुमसत आहे परंतु पंतप्रधानांना तिथे घडणाऱ्या घटनांची अजिबात काळजी नाही असे दिसते. पंतप्रधान मोदी मणिपूर वगळता प्रत्येक मुद्द्यावर बोलतात."

तर मणिपूरमधील मैतेई समुदायाची मुख्य संघटना असलेल्या मणिपूर एकात्मता समन्वय समितीने येत्या २४ तासांत कुकी अतिरेकी संघटनांवर कठोर कारवाई करण्याची मागणी राज्य सरकारकडे केली आहे.

या संघटनेनं रविवारपासून इंफाळ खोऱ्यात मोठे आंदोलन सुरू करण्याची घोषणा केली होती.

राज्यात निर्माण झालेली सध्याची परिस्थिती पाहता प्रशासनानं इंफाळ पश्चिम, इम्फाळ पूर्व, बिष्णुपूर, थौबल, काकचिंग, कांगपोकपी आणि चुराचंदपूर जिल्ह्यात दोन दिवस इंटरनेट सेवा बंद केली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २० नोव्हेंबर २०२४


## अनिल देशमुखांवरील हल्ला राजकीय वैमनस्यातून झाला असावा:उज्ज्वल निकम



**नागपूर :** माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर सोमवारी रात्री हल्ला झाला होता. या हल्ल्याचे पडसाद आता राज्यभर पसरत असल्याचे दिसत आहे. नरखेड येथून प्रचारसभा आटपून काटोलकडे परतत असताना बेला फाट्याजवळ अनिल देशमुख यांच्यावर हल्ला झाला. यात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असल्याचे समोर आले. यावर आता ज्येष्ठ सरकारी विधीज्ञ उज्ज्वल निकम यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे.

अनिल देशमुख हल्लाप्रकरणी बोलताना उज्ज्वल निकम म्हणाले, निश्चितच अशा प्रकारचा हल्ला होणे हे दुर्दैव आहे. हा हल्ला कोणी केला? केव्हा झाला? कसा झाला? याबाबत पोलिस तपास चालू आहे. पोलिस तपासानंतर सत्य उघडकीस येईल. परंतु, तो तपास पूर्ण होण्याआधी जी काही पत्रकबाजी चालू आहे, ज्या आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत ते गैर आहे असे मला वाटते. तसेच हा हल्ला राजकीय वैमनस्यातून झाला असावा, अशी शंका देखील उज्ज्वल निकम यांनी उपस्थित केली आहे.

पुढे बोलताना उज्ज्वल निकम म्हणाले, या हल्ल्यामागे काहीतरी व्यक्तीगत कारण असेल हे देखील नाकारता येत नाही. पोलिस तपासानंतर दूध का दूथ आणि पाणी का पाणी होईल. पोलिस तपास होईपर्यंत थोडी कळ सोसावी लागेल. परंतु, लोकसभेच्या मानाने विधानसभा निवडणुकीच्या प्रचारकाळात नेत्यांचे एकमेकांवरील हल्ले, प्रतिहल्ले, राजकीय स्टंटबाजी वाढल्याचे पाहायला मिळत आहे. तसेच अशा हल्ल्यांना भडकाऊ भाषणं कारणीभूत आहेत असे मला वाटते. प्रत्येक नेत्याने संयम ठेवायला हवा, असा सल्ला देखील उज्ज्वल निकम यांनी दिला आहे.

अनिल देशमुख यांच्यावर झालेल्या हल्ल्यावर बोलताना शरद पवार म्हणाले, काटोलमध्ये लोकांकडून अनिल देशमुख आणि त्यांच्या मुलाला ज्या पद्धतीचा प्रतिसाद मिळत आहे. हे काही प्रवृत्तींना सहन झाले नाही. अनिल देशमुख यांच्यावर झालेल्या हल्ल्यानंतर त्यांच्या डोक्याला लागले आहे. त्यांच्या डोक्यातून रक्त येत असल्याचे दिसत आहे. आरोप-प्रत्यारोप ठीक आहे. मात्र, अशा प्रकारचा हल्ला करणे हे अयोग्य आहे. या घटनेचा मी निषेध करतो.

सुप्रिया सुळे म्हणाल्या, ही अतिशय दुर्देवी आणि संतापजनक घटना आहे. आम्ही सर्वजण या हल्ल्याचा निषेध करतो. निवडणुकीच्या काळात अशा पद्धतीने हल्ला करणारी मानसिकता या राज्यात कधीही नव्हती. हे राज्य लोकशाही विचारांना मानणारे राज्य आहे. पण भाजपाच्या काळात राज्यातील विशेषतः नागपूर जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्थेची दुर्दशा झाली असून गुंडांना मोकळे रान मिळाले आहे. या घटनेची सखोल चौकशी होऊन देशमुख यांच्यावर हल्ला करणारे हल्लेखोर आणि त्यांचे मास्टरमाईंड गजाआड झाले पाहिजेत ही आमची मागणी आहे.

## एकनाथ शिंदेंना निवडणूक आयोगाचा दणका



**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या प्रचार तोफा थंडावल्या असल्या तरी शिवसेनेकडून छुप्या मार्गाने प्रचार केला जात असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. या संदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा पक्षाच्या विरोधात काँग्रेसने तक्रार देखील दाखल केली आहे. तसेच निवडणूक आयोगाने तत्काळ दखल घेत २४ तासाच्या आत आपले म्हणणे मांडण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले आहे. त्यामुळे आता या सर्व प्रकरणाकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षाच्या वतीने मराठी माध्यमाच्या सिरीयल मध्ये पक्षाच्या जाहिराती केल्या जात असल्याच्या आरोप काँग्रेसच्या वतीने करण्यात आला आहे. या संदर्भातली तक्रार देखील काँग्रेसचे नेते सचिन सावंत यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे. त्यांच्या या तक्रारीनंतर निवडणूक आयोगाने तत्काळ दाखल घेत २४ तासात एकनाथ शिंदे यांना म्हणणे मांडण्याचे आदेश दिले आहेत. त्या संदर्भातला पत्रक देखील जारी करण्यात आले आहे.

निवडणूक आयोगाच्या या पत्रानंतर आता सचिन सावंत यांनी या प्रकरणात तत्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी केली आहे. हे प्रकरण म्हणजे 'पेड न्यूज'चाच एक प्रकार असल्याचे देखील सचिन सावंत यांनी म्हटले आहे. त्यामुळे केवळ निवडणूक आयोगाच्या नोटीसीने काहीही होणार नाही. तर एकनाथ शिंदे यांच्या पक्षाच्या विरोधात गुन्हा दाखल करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

या संदर्भात सचिन सावंत यांनी सांगितल्यानुसार काही मराठी वाहिन्यांवर मराठी सिरीयल सुरू आहेत. या सिरीयलच्या माध्यमातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचा प्रचार केला जात आहे. मात्र या संदर्भातला खर्च निवडणूक खर्चामध्ये दाखवण्यात आलेला नाही. त्यामुळे हा पेड न्यूजचा प्रकार असल्याचा देखील आरोप सचिन सावंत यांनी केला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत तत्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणी देखील सावंत यांनी केली आहे.

## ऐतिहासिक किल्ले अंतूर येथे स्वच्छता मोहिम संपन्न



**कन्नड : (अरूण थोरात)** ऐतिहासिक किल्ले अंतूर ता. कन्नड येथे सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थान व स्वप्न इन्स्टिट्यूट क्लासेस यांच्या वतीने दुर्गसंवर्धन व स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. सह्याद्री प्रतिष्ठान च्या वतीने छ.संभाजीनगर जिल्ह्यातील विविध गडकिल्ल्यां वरती संवर्धन मोहिमांचे आयोजन करण्यात येते. नवतरुणाई, विद्यार्थ्यांना आपल्या परिसरातील गडकिल्ले, ईतिहासाची माहिती व्हावी तसेच त्यांवरील वास्तूंत स्वच्छता ठेऊण संवर्धन व्हावे यासाठी या मोहिमांचे आयोजन केल्या जाते. सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थान छ. संभाजीनगर (कन्नड तालुका) व एक स्वप्न इन्स्टिट्यूट क्लासेस आयोजित किल्ले अंतूर येथे स्वच्छता मोहीमत किल्ल्यावरील प्लास्टिक वमानव निर्मित कचरा जमा करुण दूरवर्ती नेऊण विल्हेवाट लावण्यात आली. क्लासेस मधिल विद्यार्थ्यांना प्रतिष्ठान चे कन्नड तालुका अध्यक्ष दुर्गसेवक आकाश बारगळ यांनी किल्ल्याबाबत सखोल माहिती दिली, भविष्यात गडकिल्ले हे वाचवायचे असेल तर दुर्गाच रक्षण हे आपल्या सारख्या तरुणाईलाच करावे लागेल, तीच छत्रपती शिवाजी महाराजांना आपली खरी श्रध्दांजली असेल, असे आव्हान दुर्गसेवक आकाश बारगळ यांनी केले, त्यांच्या सोबतीला गंगापूर (लासुर स्टेशन येथिल दुर्गसेवक सागर पाटील शेजूळ यांनी साथ दिली, तदनंतर पुढील मोहिमेचे नियोजन करण्यात आले, या मोहिमेत प्रतिष्ठान चे आकाश बारगळ, सागर शेजूळ, क्लासेस चे नवनाथ काळे आदींसह विद्यार्थी, दुर्गसेवक सहभागी झाले होते.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २० नोव्हेंबर २०२४


## आंबाळा ग्रामस्थांचा निवडणुकां वरील बहिष्कार मागे




**कन्नड : (अरूण थोरात)** जलजिवन मिशन जलवाहिनी खोदकामास वन्यजीव विभाग परवानगी देत नसल्याने शंभर टक्के आदिवासी लोकसंख्या असलेल्या आंबाळा ता.कन्नड ग्रामस्थांनी आगामी सर्व निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा दिलेला ईशारा मागे घेण्यात आला आहे. याबाबत उपविभागीय अधिकारी कन्नड यांना निवेदन देण्यात आले आहे.

गौताळा अभयारण्याच्या कुशीत वसलेले दुर्गम आंबाळा हे आदिवासी बहुल स्वतंत्र ग्रामपंचायतीचे गाव आहे. एक आदर्श गाव म्हणून ही अलौकिक आहे. तसेच आपल्या शांतताप्रिय एकजूटीतून सलग पाचव्यांदा ग्रामपंचायत बिनविरोध निवडली आहे. काही चित्रपटांचे चित्रीकरण ही येथे झाले आहे. जलसंधारण कामांत हे गाव आघाडीवर होते. मात्र लोकप्रतिनिधी, प्रशासनाच्या दुर्लक्षा मुळे ग्रामस्थांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. गावास पाणीपुरवठा करण्यासाठी केंद्र सरकार च्या जलजिवन मिशन योजने अंतर्गत पाणीपुरवठा योजना मंजूर झाली आहे.

यासाठी वडनेर पाटबंधारे क्षेत्रात विहिर खोदण्यात आलीय. मात्र विहिर ते गाव दरम्यान वन्यजीव विभागाचे जंगल असल्याने परवानगी अभावी जलवाहिनी चे खोदकाम अडविण्यात आले आहे. परवानगी साठी अर्जफाटे करुण ही वन्यजीव विभाग परवानगी देत नसल्याने ग्रामस्थांना पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागत आहे. त्यामुळे त्रस्त झालेल्या ग्रामस्थांनी आगामी सर्व निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतल्याचे निवेदन प्रशासनाला दिला होता.याबाबत वरिष्ठ कार्यालयास पाठविलेल्या अहवालात असलेल्या तृटी दूर करुण, सदरील प्रस्ताव पुन्हा पाठविण्यात येईल तरी निवडणुकांवर टाकलेला बहिष्कार मागे घेण्यात यावा असे लेखीपत्र गौताळा औट्रमघाट अभयारण्य चे सहाय्यक वन्यजीव रक्षक एस. एन. शिंदे यांनी दिल्यामुळे सदरील बहिष्कार मागे घेण्यात येत असल्याचे निवेदन गंगाराम अगिवले, सुकदेव उघडे, सुभाष उघडे, दामू उघडे, बुधा गावंडे आदी ग्रामस्थांनी दिले आहे.

## गोटे मारा किंवा गोळ्या झाडा, मी मरणार नाही



**नागपूर :** राज्याचे माजी गृहमंत्री आणि शरद पवार गटाचे नेते अनिल देशमुख यांच्या वाहनावर काल हल्ला करण्यात आला होता. अज्ञातांनी केलेल्या दगडफेकीत अनिल देशमुख जखमी झाले होते. त्यांच्यावर नागपुरातील उपचार करण्यात आले. अनिल देशमुख यांना आज सायंकाळी रुग्णालयातून डिस्चार्ज दिला आहे. हल्ला करणाऱ्याला सोडणार नाही, असा इशारा अनिल देशमुख यांनी दिला आहे.

रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर अनिल देशमुख यांनी माध्यमांशी संवाद साधला. अनिल देशमुखावर तुम्ही गोटे मारा किंवा गोळ्या झाडा, अनिल देशमुख मरणार नाही, तुम्हाला सोडणारही नाही. मी सगळ्यांना धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही, असे प्रतिक्रिया अनिल देशमुख यांनी दिली आहे.

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते व माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर झालेल्या हल्ल्या प्रकरणात अज्ञात चार युवकांविरुद्ध खून करण्याचा प्रयत्न करणे या कलमाखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास काटोलचे उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्याकडे देण्यात आल्याची माहिती नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी दिली आहे.

नागपुरातील नरखेड येथील सांगता सभा आटोपून माजी गृहमंत्री अनिल देशमुख हे काटोल येथे येत होते. काटोल येथील तीनखेडा-भिष्णुर मार्गाने परत येताना जलालखेडा रोडवरील बेलफाट्यावजवळ त्यांच्या गाडीचा वेग कमी झाला. याचा फायदा घेत काही अज्ञातांनी त्यांच्या कारवर मोठ्या प्रमाणात दगडफेक केली. या हल्ल्यात अनिल देशमुख यांच्या गाडीचा काच फुटला आणि दगड थेट अनिल देशमुखांच्या डोक्याला लागला. या घटनेत अनिल देशमुख हे जखमी झाले होते. त्यांच्यावर काटोलच्या रुग्णालयात प्राथमिक उपचार करून नागपूर येथील रुग्णालयात हलविण्यात आले होते. त्यांना आज रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. दरम्यान, या हल्ल्यामागे भाजपचा हात असल्याचा आरोप माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी केला होता.

दुसरीकडे, भाजपने अनिल देशमुखांवरील हल्ला हा राजकीय स्टंटबाजी असल्याचा आरोप केला आहे. देशमुख स्वतःच आपल्या कार्यकर्त्यांकडून दगडफेक करून घेतली, असे भाजपचे काटोल मतदारसंघाचे प्रभारी अविनाश ठाकरे यांनी म्हटले आहे. काटोलमध्ये अनिल देशमुख यांचे सुपुत्र सलील यांचा सामना भाजपच्या चरणसिंह ठाकूर यांच्याशी आहे.

## देवेंद्रजी खुश तो बहुत होंगे आप-सुषमा अंधारे



**मुंबई :** भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी मतदारांना पैसे वाटप केल्याचा आरोप बहुजन विकास आघाडीकडून करण्यात आला. या घटनेमुळे राज्यात खळबळ उडाली असून राजकारण चांगलेच तापले आहे. या सर्व प्रकारावरून ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे. देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा एकदा मराठा नेतृत्व संपवले, असा थेट आरोपच सुषमा अंधारे यांनी केला.

सुषमा अंधारे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत देवेंद्र फडणवीस आणि महायुतीवर टीका केली. भाजपच्या नोट जिहादने तावडेंच्या आयुष्याचा भयंकर विनोद झाला... ! पुन्हा एकदा मराठा नेतृत्व संपवले, असे म्हणत देवेंद्रजी खुश तो बहुत होंगे आप..? असा सवाल सुषमा अंधारे यांनी फडणवीसांना विचारला.

कशाला निवडणूक आयोगाने निवडणुका जाहीर केल्या? उमेदवारी अर्ज, चिन्ह, स्क्रूटनीचे नाटक कशाला ..? आचारसंहितेच धाक फक्त विरोधकांना दाखवायचा? आजच तुमचे सरकार झाले हे जाहीर करा आणि लगेचच फडणवीस विनोद तावडे यांचा शपथविधी करून टाका. उद्याचे मतदान, परवाच्या निकालाची वाट बघू नका, असा घणाघातही अंधारे यांनी केला.

विधानसभा निवडणुकीच्या मतदानाला अवघे काही तास शिल्लक असताना विरारमध्ये भाजपचे राष्ट्रीय नेते विनोद तावडे हे ५ कोटी रुपये वाटत असताना सापडल्याचा गंभीर आरोप बहुजन विकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. यावरून आता महाविकास आघाडीच्या नेत्यांनी विनोद तावडे आणि भाजप महायुतीवर टीका करण्यास सुरुवात केली आहे.

भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांना वसई विरार येथे पैसे वाटताना रंगे हात पकडले गेले आहे. राज्यात जागोजागी हेच चित्र आहे. महायुतीचे प्रमुख नेते पैशांच्या बॅगा घेऊन प्रत्येक मतदारसंघात महाराष्ट्रातील स्वाभिमानी जनतेला विकत घेण्याचा प्रयत्न करत आहेत, अशी प्रतिक्रिया जयंत पाटील यांनी दिली.

भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांना विधानसभा निवडणुकीत पैसे वाटावे लागणे हे अत्यंत दुर्दैवी असल्याची प्रतिक्रिया शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दिली. महाराष्ट्राची अशी संस्कृती नाही. एखाद्या छोट्या कार्यकर्त्याने पैसे वाटले असते तर ठीक मात्र पक्षाच्या राष्ट्रीय सरचिटणीस आणि असे पैसे वाटणे म्हणजे अत्यंत दुर्दैव असल्याची, भावना दानवे यांनी व्यक्त केली.

यांच्याकडे पैसे येतात कुठून? नोटबंदी भाजपाच्या सरकारने केली. मग एवढ्या नोटा येतात कुठून? एकीकडे नोटबंदी करता मग चलनात एवढी रोख रक्कम येते कुठून? विनोद तावडेंवर हा आरोप होतोय ही अतिशय धक्कादायक बाब आहे. भाजपाच्या ओरिजिनिल लोकांकडून अशी कृती कधीच होणार नाही. ही अस्वस्थ करणारी कृती असल्याचे सुप्रिया सुळे म्हणाल्या आहेत.


इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com
साहिल
कॉम्प्युटर्स अँड प्रिंटर्स
• डी.टी.पी.जॉब वर्क
• मराठी, हिंदी, इंग्रजी
• एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
• स्पायरल / हार्ड बाईन्डींग
• लॅमिनेशन
• कलर प्रिंट
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.